


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक १, रविवार १० नोव्हेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# महिलांच्या डोक्यावरील पाण्याचा हंडा उतरविणार

## ■ राणी लंके यांची ग्वाही ■ कान्हूरपठार येथे घोंगडी बैठक

कान्हूरपठार : प्रतिनिधी

**कान्हूरपठार व परिसरात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावत असून महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरविण्यासाठी आपण विधानसभेत आवाज उठवून शास्वत पाणी योजना माग लावण्यासाठी प्रतिष्ठा पणाला लावू अशी ग्वाही महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांनी दिली.**

लंके यांच्या प्रचारार्थ आयोजित बैठकीसाठी राणी लंके या कान्हूरपठारमध्ये दाखल झाल्यानंतर त्यांचे मोठया जल्लोषात स्वागत करण्यात आले.

यावेळी बोलताना लंके म्हणाल्या, सन २०१९ मध्ये खा. नीलेश लंके यांना मतदारांनी मोठया मताधिक्क्याने विधानसभेत पाठविल्यानंतर त्यांनी त्या पदाला न्याय दिला. मतदारसंघात हजारो कोटी रूपयांची कामे माग लावली. कोणत्याही लोकप्रतिनिधीने मतदार संघात साडेचार वर्षांच्या कालखंडात इतक्या मोठया प्रमाणात विकास कामे माग लावलेली नाहीत. प्रत्येक गावाला विकास कामे देण्याचा प्रयत्न केला गेला. विकास कामे देताना कोणताही राजकीय अभिनिवेश न ठेवता कामे मंजुर करण्यात आली. असे असतानाही विरोधक विकास कामांबाबत चर्चा करतात ती हस्यास्पद आहे. राज्याचे अर्थमंत्री अजितदादा पवार यांनीच लोकसभा निवडणूकीदरम्यान खा. लंके यांनी मतदारसंघासाठी किती निधी खेचून आणला याबाबत सांगितलेले असताना विकास कामांबाबत स्वतः कडे सांगण्यासारखे काही नसताना नागरीकांची दिशाभूल करण्याचे काम विरोधक करत असल्याचे लंके यांनी सांगितले.

यावेळी चंद्रभान ठुबे, किरण ठुबे, बाबासाहेब घुमटकर, प्रसाद नवले, धनंजय ठुबे, शिवाजी व्यवहारे, सरपंच संध्या ठुबे, मा. सरपंच गोकुळ काकडे, मा. उपसरपंच सागर व्यवहारे, विशाल लोंढे, वैभव साळवे, बापू चत्तर, श्रेयश घोडके, तुषार सोनावळे, सुरज नवले, गणेश तांबे, ज्ञानेश्वर गायखे, श्रीकांत ठुबे, राणी घुमटकर, गीतांजली ठुबे, सुशिला ठुबे, देवराम टेकाडे, आनंदीबाई टेकाडे, अनिता घोडके, लता ठुबे,राजाराम ठुबे, भोमा ठुबे, गणेश गायखे आदी उपस्थित होते.



■ विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या बैठकीस मोठा प्रतिसाद लाभला.

### वाजत गाजत मिरवणूक, फुलांचा वर्षाव

लंके यांचे आगमन झाल्यानंतर त्यांची मुख्य बाजारपेठेतून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. ठिकठिकाणी त्यांच्यावर फुलांचा वर्षाव करण्यात येत होता. महिलांकडून त्यांचे औक्षण करण्यात येत होते. महिला तसेच कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून ही प्रचाराची सभा नाही तर विजयाची सभा असल्याचा अभास होत असल्याचे लंके यांनी सांगितले.

### अनुभवाच्या शिदोरीवर आक्रमक प्रश्न मांडणार

सन २०१२ मध्ये पंचायत समितीचे उपसभापतीपद, सन २०१७ मध्ये जिल्हा परिषदेचे सदस्यपद तसेच जिल्हा नियोजन समितीचे सदस्यपद आपण भुषविलेले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कामाच्या अनुभवामुळे मला जनतेचे प्रश्न ज्ञात आहेत. याच अनुभवाच्या शिदोरीवर पारनेर-नगर मतदारसंघाच्या विविध पश्नांवर विधिमंडळात आपण आक्रमक भुमिका मांडून खा. नीलेश लंके यांच्याप्रमाणेच विकासाची अविरत सुरू ठेवणार आहोत.

**राणी लंके**
महाविकास आघाडीच्या उमेदवार

### २४ चा योगायोग जुळून आलांय !

गेल्या ७४ वर्षापासून या मतदारसंघाला महिला आमदाराची प्रतिक्षा होती. तो योगायोग असा जुळून आलाय की यंदाचे वर्ष २०२४ आहे. मतदार संघाचा अनुक्रमांक २२४ आहे. राणी लंके यांचा जन्मदिनांक २४ आहे. त्यांनी दि. २४ तारखेलाच अर्ज दाखल केला आहे. तर मतमोजणी २३ रोजी असली तरी दि.२४ नोव्हेंबरच्या वर्तमानपत्रात राणी लंके यांच्या विजयाच्या बातम्या प्रसिध्द होणार आहेत.

**जितेश सरडे**
प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी आयटी सेल

### भाषणासाठी आपण सक्षम

मला सभेमध्ये बोलता येईल का याबाबत काहींचे गैरसमज होते. मात्र वेळप्रसंगी काय बोलायचे, कोणत्या चेंडूवर चौकार, षटकार मारायचा हे मला चांगले जमते असे सांगत लंके यांनी आपण सभा गाजविण्यासाठी सक्षम असल्याचे सांगितले.

### कान्हूरकरांची एकी कौतुकास्पद

कान्हूरपठारमधील सर्व गट-तटाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मतभेद विसरून एकत्र झाले याचा मनस्वी आनंद आहे. गावकऱ्यांची ही एकी कौतुकास्पद आहे. कान्हूरकरांची ही एकी मतपेटीतून निश्चित पहावयास मिळेल असा विश्वास लंके यांनी व्यक्त केला.

### महिला राज !

या बैठकीच्या व्यासपीठावर महिला होत्या. उपस्थितांमध्येही महिलांचीच संख्या अधिक होती. बैठकीत कधी न बोलणाऱ्या मुली महिला या बैठकीत व्यक्त होत होत्या. आपल्या समस्या मांडत होत्या. तुमची हक्काची आमदार म्हणून मी तुमच्या समस्या दुर करण्यासाठी मी सदैव तुमच्या पुढे असेल अशी ग्वाही राणी लंके यांनी यावेळी दिली.

# शेतकरी, नागरिकांच्या प्रश्नावर आवाज उठविणार

## काशिनाथ दाते यांचे प्रतिपादन | जवळे येथे कॉर्नर सभा




■ जवळे येथे पार पडलेल्या कॉर्नर सभेत महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांनी मार्गदर्शन केले.

जवळे : प्रतिनिधी

**विधानसभा निवडणूकीमध्ये संधी दिल्यास विधिमंडळात शेतकरी, नागरिकांच्या प्रश्नांवर आपण आवाज उठविणार असल्याचे सांगतानाच या निवडणूकीत विकासाच्या मुद्यावर आपण उतरलो असल्याचे प्रतिपादन महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांनी सांगितले.**

पारनेर तालुक्यातील जवळे येथे दाते यांच्या गावभेट दौऱ्यादरम्यान झालेल्या कॉर्नर सभेत दाते हे बोलत होते. ते म्हणाले, या मतदारसंघाची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला देण्यात आल्यानंतर महायुतीचा घटक पक्ष असलेल्या भारतीय जनता पक्षाने सर्वप्रथम आपणास मदतीचा हात दिला. तालुक्यात भाजपाची संघटना मजबूत असून आपली उमेदवारी जाहिर होताच भाजपा पदाधिकाऱ्यांनी कशाचीही वाट न पाहता प्रचारासही सुरूवात केली. नगर तालुक्याच्या दौऱ्यांप्रसंगी त्याची प्रकर्षाने जाणीव झाल्याचे दाते म्हणाले. निवडणूकीतील विजयामध्ये माझ्या माता भगिनींचा मोठा वाटा असेल असेही त्यांनी स्पष्ट केले.

दाते म्हणाले, शेतकरी आणि नागरिकांच्या प्रश्नांवर आवाज उठविण्यासाठी आम्ही सदैव तयार आहोत. आजचा प्रचार दौरा हा या भागातील विकासाठी आणि शेतकरी कल्याणासाठीच आहे. अजित पवार यांनी केलेली लोकप्रिय घोषणा मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थी असलेल्या माझ्या लाडक्या बहिणी या योजनेवर अतिशय खुष आहेत. महिलांच्या चेहऱ्यावरचा तो आनंद मला प्रकर्षाने जाणवत असून या सरकारने अनेक कल्याणकारी योजना राबविल्या असल्याने हे सरकार पुन्हा एकदा सत्तेवर येणार आहे. राज्यात आणि केंद्रात एकाच विचाराचे सरकार आल्यास राज्याचा सर्वांगिण विकास झाल्याशिवाय राहणार नाही असे दाते म्हणाले.

यावेळी विश्वनाथ कोरडे, प्रशांत गायकवाड, अशोक सावंत, राहुल शिंदे पाटील, गणेश शेळके, विक्रम कळमकर, सचिन वराळ पाटील, पंकज कारखिले, सोनाली सालके, सुषमा रावडे, नवनाथ सालके, कृष्णाजी बडवे यांच्यासह स्थानिक नागरीक यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते.

### बालंट आणण्याचा प्रयत्न

मी स्वभावाने शांत असलो तरी अन्यायाचा प्रतिकार केल्याशिवाय राहणार नाही. मी निवडणूकीला उभा राहू नये यासाठी अनेक अडथळे निर्माण करून माझ्यावर बालंट आणण्याचे प्रयत्न झाले. माझ्यावर खोटे नाटे आरोप करण्यात आले. मनोधैर्य खचविण्याचा प्रयत्न झाला. निवडणूकीतून मला बाजूला करण्याचे षडयंत्र रचले गेले. माझ्यावर कितीही आरोप करण्यात आले तरी पारनेरची जनता त्यावर विश्वास ठेवणार नाही. कोणत्याही दमबाजीला घाबरू नका. खंबीर व्हा, आमदार पदाचा वापर सर्वसामान्यांच्या हितासाठी, सर्वसामान्यांची कामे करण्यासाठी करावा लागतो.

**काशिनाथ दाते**
महायुतीचे उमेदवार

### भाजपा दाते यांच्या पाठीशी

उमेदवारी जाहिर होताच भाजपाची संपूर्ण यंत्रणा सर्व शक्तीनिशी महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. दाते यांच्या विजयात आपल्या सर्वांचा विजय सामावलेला आहे.मतदान होईपर्यंत आपण सर्वांनी कुणाच्याही आणि कुठल्याही निमंत्रणाची वाट न पाहता आपणच उमेदवार आहोत हे मनाशी निश्चित करून काम करा. पुढील ११ दिवस दाते यांच्यासाठी द्या, पुढील पाच वर्षे दाते आपली काळजी घेतील.

**विश्वनाथ कोरडे**
प्रदेश सरचिटणीस, भाजपा

### भावनिक नाते

महिला आणि महायुतीचे एक भावनिक नाते तयार झाले आहे. मतदारसंघातील प्रत्येक महिला महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या पाठीशी कर्तव्य भावनेतून खंबीरपणे उभी असून ज्या दिवशी या मतदारसंघात महायुतीचे उमेदवार विजयी झाल्याची अधिकृत घोषणा होईल त्या दिवशी बहिण, भावाच्या नात्यात असलेल्या दढ विश्वासाची प्रचिती येईल.

**सोनाली सालके**
भाजपा, महिला तालुकाध्यक्ष

# लंके यांच्या प्रचारार्थ सोमवारपासून गटनिहाय सभा


## विविध मान्यवर प्रमुख वक्ते म्हणून हजेरी लावणार

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर-नगर मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ सोमवार दि.११ नोव्हेंबर पासून जिल्हा परिषदेच्या गटनिहाय सभांचे आयोजन करण्यात आले असून या सभांसाठी प्रमुख वक्ते हजेरी लावणार आहेत.**

सोमवार दि.११ रोजी सकाळी १० वाजता वाळवणे येथील श्री भैरवनाथ देवस्थान येथे नारळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ करण्यात येईल. सुपा गटातील सुपा, रांजणगांव मशिद, गटेवाडी, हंगा, भोयरे गांगर्डा, राळेगणसिध्दी, शहंजापुर, वाडेगव्हाण, जातेगांव, मुंगशी, यादववाडी, कुरूंद, अस्तगांव, नारायणगव्हाण, पळवेखुर्द, रायतळे, मावळेवाडी, पळवे बुद्रुक, वाळवणे, घाणेगांव, पाडळी रांजणगांव, आपधुप, वडनेर हवेली, कळमकरवाडी, बाबुड, म्हसणे सुलतानपुर, कडूस, रूईछत्रपती, वाघुंडे बुद्रुक, पिंपरीगवळी, वाघुंडे खुर्द येथील मतदारांना या कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले आहे.

विधानसभेची निवडणूक जाहिर होण्यापूवच महाविकास



आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांनी मतदारसंघाचा दौरा सुरू केला होता. गावागावांशी संपर्क झाल्याने त्यांची मतदारांशी थेट भेटी गाठी झाल्या आहेत. निवडणूक जाहिर झाल्यानंतर लंके यांनी गावनिहाय घोंगडी बैठकांचे आयोजन केले होते. या बैठकांच्या माध्यमातूनही त्यांची प्रचाराची आणखी एक फेरी पुर्ण झाली आहे. आता गटनिहाय सभांच्या माध्यमातून लंके या पुन्हा मतदारांशी संवाद साधणार आहेत. मंगळवार दि. १२ रोजी सकाळी १० वाजता भैरनाथ देवस्थान पुणेवाडी येथे कान्हूरपठार गट व पारनेर शहर, सायंकाळी साडेपाच वाजता ढवळपुरी गट नागेश्वर देवस्थान भाळवणी येथे, बुधवार दि. १३ रोजी सायंकाळी साडेपाच वाजता रंगनाथ स्वामी देवस्थान पोखरी येथे टाकळीढोकेश्वर गटातील सभा होईल.

### निघोज गट

निघोज गटामध्ये निघोज येथे मळगंगा माता देवस्थान येथे नारळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ सोमवार दि.११ रोजी सायंकाळी साडेपाच वाजता करण्यात येणार आहे. यावेळी निघोज, गुणोरे-गाडीलगांव, लोणीमावळा, मोरवाडी, राळेगणथेरपाळ, हकीगतपुर-माजमपुर, पाबळ, ढवणवाडी, म्हसे खुर्द, म्हस्केवाडी, वडगाव गुंड, अळकुटी, रेनवडी, शिरसुले, दरोडी, चोंभूत तनपुरेवाडी, गारखिंडी, शिरापुर, वडनेरबुद्रुक,कळस, नरसाळेवाडी,बाबरमळा, पाडळी आळे,रांधे,कोहकडी, वाजेवाडी,डेरेमळा,पठारवाडी, शेरी कासारे या गावांतील मतदारांना या कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले आहे.



# रोचक

## कॅफेत बदक बनले ग्राहकांचे आकर्षण

बीजिंग : चीनच्या एका कॅफेमध्ये एक बाब ग्राहकांच्या आकर्षणाचे केंद्र बनली आहे. चेंगडू शहरातील कॅफेमध्ये बदक ग्राहकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले आहेत. या हॉटेलमध्ये येणाऱ्या ग्राहकाला ७८ युआन भरून या बदकांबरोबर ९० मिनिटे घालवता येतात. येणारे ग्राहक या बदकाबरोबर सेल्फीदेखील काढतात. सोशल मीडियावर या बदकांबरोबरील फोटो पोस्ट करण्यासाठी तरुणांची चांगलीच गर्दी होत आहे. या कॅफेमध्ये चार पांढरी बदके आहेत. या क्यूट बदकांबरोबर वेळ घालवण्यासाठी ग्राहक देखील मोठ्या प्रमाणात गर्दी करताना दिसतात. या बदकांचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झाले आहेत. एका विद्यार्थिनीने सांगितले की, हे बदक खरंच मजेदार आहेत आणि आज्ञा पाळणारे देखील. या कॅफेबद्दल ऑनलाइन वाचल्यानंतर मी त्वरित या ठिकाणी भेट दिली. २६ वर्षीय लुओ यॉंची हिने इतर तीन जणांबरोबर मिळून या ॲनिमल कॅफेची सुरुवात केली आहे. घरात बदक पाळत असताना तिला याबाबतची कल्पना सुचली. येथे येणाऱ्या ग्राहकांना छोट्या डुकरांबरोबर देखील वेळ घालवायला मिळतो. बदकांप्रमाणेच हे छोटे डुकर या कॅफेतील रहिवासी आहेत.



## हैदराबादची खासियत... मुन्शी नान!

हैदराबाद : हैदराबादमधील खास खाद्यपदार्थांचा उल्लेख होताच ठिकठिकाणी मिळणारे चविष्ट हलीम आणि गरमागरम हैदराबादी बिर्याणीचे चित्र हटकून डोळ्यांसमोर उभे राहते. पण हैदराबाद येथील आणखी एक खासियत आहे, ती म्हणजे मुन्शी नान. चौकोनी आकाराचा हा अतिशय चविष्ट नान जर एकदा तुम्ही चाखलात, तर



त्याची चव तुमच्या जिभेवर कायम रेंगाळत राहील. १८५१ साली मोहम्मद हुसेन साहेब या निझाम दरबारी कार्यरत असणाऱ्या कारकुनाने प्रथम तयार केलेला हा पदार्थ आहे. तेव्हापासून या पदार्थाला मुन्शी नान, म्हणजेच कारकुनाने तयार केलेला नान या नावाने ओळखले जाते. तेव्हापासून हैदराबाद येथील पुरानी हवेली येथे गेली वर्षानुवर्षे हे नान तयार केले जात असून, हैदराबाद येथील सर्वाधिक लोकप्रिय पदार्थांपैकी असा हा पदार्थ आहे. हे नान बनविण्याची परंपरा गेली १६७ वर्षे अव्याहत सुरू आहे. मोहम्मद हुसेन साहेबांच्या पाचव्या पिढीतील लोक आजच्या काळामध्ये हा नान बनविण्याचा व्यवसाय चालवत आहेत. जेव्हापासून हे नान प्रथम बनविले गेले तेव्हापासून ते आजतागायत त्यांची चव आणि अव्वल दर्जा कायम आहे आणि हीच त्यांची खासियत आहे. हे नान सामान्य पोळीच्या मानाने पुष्कळ जाड दिसत असले, तरी अतिशय मुलायम असून, हे इतर पोळ्यांच्या किंवा पराठ्यांच्या मानाने अधिक काळ गरम राहणारे असतात. एका मुन्शी नानची किंमत केवळ चौदा रुपये असून, हैदराबादमध्ये हे नान अतिशय लोकप्रिय आहेत. सर्वसाधारणपणे गरमागरम चविष्ट, मसालेदार मांसाहारी पदार्थांच्या जोडीने हे नान खाल्ले जातात. या नानच्या जोडीने विशेष करून मरग हा पदार्थ खाल्ला जातो. जर कधी हैदेराबादला जाणे झालेच तर हा चविष्ट मुन्शी नान चाखण्यास विसरू नका.

## घरांवर कणसांचे तोरण...जितकी जास्त कणसे तो 'मोठा'!

नवी दिल्ली : उत्तराखंड राज्यातील सियंजी आणि भाटोली नामक गावांत अनोखी परंपरा वर्षानुवर्षांपासून जोपासली जात आहे. या गावांतील प्रत्येक घरावर मकाची कणसे तोरण म्हणून लटकवलेली दिसतात. सियंजी गाव मसुरी या प्रसिद्ध हिलस्टेशनपासून दहा किलो मीटरच्या अंतरावर आहे. या गावातील लोकांच्या जीवनात मकाचे स्थान अनन्यसाधारण आहे. गावात होत असणाऱ्या पिकांमध्ये मका पीक मुख्य आहे. गावातील बहुतेक शेतकरी मका पेरतात. मकाची भाकरी आणि अक्रोडची चटणी हे येथील स्थानिक भोजन आहे. मकाची कणसे शेतातून तोडून आणल्यानंतर त्यातील काही कणसे घराच्या भोवती उंचावर टांगून ठेवली जातात. ही कणसे वाळवून त्या दाण्यांचा उपयोग पुढील पेरणीसाठी



केला जातो. पण त्याशिवाय अशाप्रकारे टांगलेली कणसे गावकऱ्यांसाठी सन्मानाचे, अभिमानाचे प्रतीक समजली जातात. किंबहुना जितकी जास्त कणसे घराच्या अवती भोवती टांगलेली असतील, तितकी त्या घरामध्ये जास्त सुबत्ता नांदते, असे येथील गावकरी मानतात. एकूण पंधरा घरांची वस्ती असलेले हे लहानसे गाव अतिशय स्वच्छ असून, मेहनतीने घर चालविण्याचे, घरासाठी पैसा कमावण्याचे काम येथील महिला करतात. शेतांमध्ये काम करत असतानाच बिडी किंवा हुक्का पिणे हा या महिलांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. येथील घरे देवदार लाकूड वापरून बनविलेली असून, घराचे मुख्य प्रवेशद्वार अगदी लहानसेच असते. चोरांना सहजासहजी घरात शिरता येऊ नये यासाठी ही दारे अतिशय कमी उंची असलेली बनविण्यात येतात. या गावात गढवाल इंग्लिश मीडियम स्कूल नामक एकमेव शाळा असून, पंधरा विद्यार्थी या शाळेमध्ये शिक्षण घेत आहेत.



## तलावावर सतत पडते वीज... रहस्य उलगडेना!

न्यूयॉर्क : विज्ञानाने भलेही कितीही प्रगती केली असली तरी या पृथ्वीतलावर अजूनही अशी अनेक ठिकाणे आहेत, ज्यांचे रहस्य सोडविण्यात वैज्ञानिक देखील अयशस्वी ठरले आहेत. अशीच एक जागा दक्षिण अमेरिकेच्या व्हेनेझुएला देशात आहे. जिथे तलावावर सदैव वीज पडत राहते. मात्र आजपर्यंत कोणालाही त्याचे रहस्य माहित नाही. आकाशात वीज कधीच एकाच ठिकाणी दोनदा चमकत नाही, परंतु हे ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटेल की या ठिकाणी एका तासात हजारो वेळा वीज चमकते. जगाला हादरवून टाकलेल्या या गूढ गोष्टीला बीकन ऑफ मराकाइबो असे म्हणतात. यात इतर अनेक नावे आहेत, जसे की कॅटाटुम्बो लाइटनिंग, एवरलास्टिंग स्टॉर्म, ड्रॅमेटिक रोल ऑफ थंडर. या जागेला जगातील नैसर्गिक ऊर्जा घर देखील म्हटले जाते. बीबीसीच्या वृत्तानुसार, व्हेनेझुएलातील कॅटाटुम्बो नदी, जिथे ती मराकाबो तलावाशी मिळते, वर्षात २६० दिवस वादळ होते. या २६० दिवसांच्या तुफानी रात्रींमधून येथे रात्रभर विजांचा कडकडाट सुरू असतो. गिनीज बुकमध्ये मॅकायबो लेकचे नाव सर्वात चमकणारे ठिकाण अशी नोंद आहे. हिवाळ्याच्या हंगामात कमी, परंतु पावसाळ्यात भरपूर प्रमाणात वीज चमकत असते. एका अहवालानुसार या हंगामात दर मिनिटाला २८ वेळा विजेचा लखलखाट होतो. आपणास हे जाणून आश्चर्य वाटेल की या आकाशातील विजेची चमक इतकी आहे की ४०० किलोमीटरच्या अंतरावरून देखील ती दृश्यमान आहे. लोक म्हणतात की असे दिसते की जणू आकाश बहुरंगी प्रकाशात आंघोळ करत आहे. खरं तर, या क्षेत्रात इतक्यावेळा वीज का चमकते हे जाणून घेण्यासाठी विशेषज्ज्ञ वर्षानुवर्षे गुंतलेले आहेत. १९६० च्या दशकात असे मानले जात होते की या भागात युरेनियम जास्त आहे, म्हणून येथे आकाशात वीज चमकते. शास्त्रज्ञांनी अलीकडेच एक संशोधन केले होते, त्यानुसार आकाशामध्ये विजेमुळे तलावाजवळील तेलाच्या शेतात मुबलक प्रमाणात मिथेन आहे. तथापि, युरेनियम आणि मिथेनचा सिद्धांत प्रामाणिकपणे सिद्ध झाला नाही म्हणूनच, हे स्थान अद्याप एक रहस्य आहे.





## पाच मुलांची आई आहे स्टेनगन्सची शौकीन!

**वॉशिंग्टन : केसी केरी हिला ऑनलाइन विश्वात शस्त्रांच्या दुनियेतली मिस अमेरिका म्हणून ओळखले जाते. आपल्या इन्स्टाग्रामवर केसी सातत्याने विविध शस्त्रांसह फोटोज आणि व्हिडीओज शेअर करते. कारण वेगवेगळ्या प्रकारच्या स्टेनगन्स बाळगणं आणि धडाधड गोळ्या मारणं हा तिचा जगावेगळा छंद आहे. विशेष म्हणजे, ती पाच मुलांची आई असूनही तिचं हे वेड कमी झालेलं नाही आणि तिचा आयुष्याचा जोडीदार नील केरी तिला वेगवेगळ्या मेकच्या स्टेनगन्सची माहिती देत असतो.**

केसी केरीला लहानपणापासूनच स्टेनगनमधून धडाधड वेगाने सुटणाऱ्या गोळ्यांविषयी आकर्षण होते. ऐन तारुण्यात तिने बंदूक चालवणे शिकून घेतले आणि आपसूकच ती शस्त्रांच्या प्रेमात पडली. सध्या तिच्या उटाहमधल्या घरात वेगवेगळ्या क्षमतेच्या आणि बनावटीच्या स्टेनगन्सचा साठा आहे. खूप सारी शस्त्रं घरातच असल्यानं आणि सर्वच अत्याधुनिक शस्त्रं स्वत:ला चालवता येत असल्यानं केसीला आपण सर्वाधिक सुरक्षित असल्याचं वाटतं. तिचे इन्स्टाग्राम पेज असून ती सातत्याने आपले आक्रमक अवतारातले फोटो त्या पेजवर शेअर करते. या पेजला तिला ३३ लाखांपेक्षा जास्त फॉलोअर्स असून, त्यात दिवसेंदिवस वाढच होत आहे. अमेरिकेत अगदी लहान मुलांच्या हातात आता बंदुका आल्या असून शाळेमध्ये मुलांनी केलेल्या गोळीबाराच्या घटनांची संख्या वाढत असताना, केसीने अशा प्रकारे हिंसाचाराला प्रोत्साहन देणारा छंद का जोपासला, असे विचारता केसी सांगते की, बंदुकीतून सुटणारी गोळी ही अमेरिकेची समस्या नसून लहान मुलांमध्ये अतिशय लहान वयात येणारे नैराश्य हे या हिंसाचाराचे मुख्य कारण आहे. मला पाच मुले असूनही त्यांच्यापैकी कोणालाही बंदूक चालवून पहावीशी वाटत नाही, असे ती म्हणाली.



## जगातील सर्वात छोटा घोडा १ फूट दहा इंचाचा!



लंडन : घोडे तर तुम्ही अनेकदा पाहिले असतील. मात्र जगातील सर्वात छोटा घोडा पाहिला आहे का? बॉम्बेल नावाचा हा घोडा पॉलंडमधील आहे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डनुसार या घोड्याची उंची केवळ ५६.७ सेंमी (१ फूट १० इंच) आहे. हा घोडा एवढा प्रसिध्द आहे की, लोक त्याला पाहण्यासाठी गर्दी करतात. पोलंडमधील कासकाडा येथील फार्ममध्ये तो एका दुसऱ्या मोठ्या घोड्याबरोबर राहतो. या घोड्याचे मालक पॅट्रीक आणि केटरजाइना यांनी २०१४ मध्ये त्याला सर्वांत प्रथम पाहिले होते. त्यावेळी हा छोटा घोडा केवळ दोन महिन्यांचा होता. पहिल्यांदा त्यांना वाटले की, त्याला काहीतरी झाले आहे, मात्र नंतर समजले की, त्याची वाढच होत नाही. त्यानंतर त्यांनी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये त्याची नोंद करण्याचा विचार केला. त्याच्या मालकांनी सांगितले की, घोडा छोटा असला तरी त्याचे मन खूप मोठे आहे. दर आठवड्याला तो हॉस्पिटलमध्ये जाऊन तेथील आजारी मुलांच्या चेहऱ्यावर हास्य आणतो. सोशल मीडियावर बॉम्बेलचे फोटो चांगलेच व्हायरल झाले आहेत.

## अब्जाधीशाने शाळेचे रुपांतर केले राजमहालात



लंडन : शाळेत असताना आपली शाळा एखाद्या राजमहालाप्रमाणे असावी, असे प्रत्येकालाच वाटत असते. रशियाचे अब्जाधीश आंद्रेई सिमानोव्स्की यांनी हेच स्वप्न साकार करत शिक्षण घेतलेल्या शाळेचा कायापालट केला आहे. त्यांनी शाळेला चक्क राजमहालामध्येच बदलले आहे. आंद्रेई सिमानोव्स्की हे एक उद्योगपती असून, त्यांनी येकातेरिनबर्ग १०६ सेकंडरी शाळेचा कायापालट केला आहे. सोशल मीडियावर या शाळेचे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल झाल्यावर नेटिझन्सनी त्यांचे कौतूक केले. शाळेच्या छतावर लावलेले सोन्याचे झुंबर पाहून असे वाटते की, एखाद्या फ्रान्सच्या पॅलेसमध्येच आलो आहोत. शाळेचे बहुतांश काम पूर्ण झाले आहे. वर्ग आणि ऑफिस देखील बदलण्यात येत आहे. स्थानिक प्रशासनाने परवानगी दिली तर खेळाचे मैदान आणि जिमदेखील बदलणार असल्याचे आंद्रेई यांनी सांगितले. शाळेला अशाप्रकारे महालाचे स्वरुप दिल्याने अनेक डिजाइनर्स आणि ब्लॉगर्स त्यांच्यावर टीका करत आहेत, मात्र प्रशासनाकडून त्यांना विरोध करण्यात आलेला नाही. येकातेरिनबर्गचे महापौर अलेक्जेंडर वायसोकिंस्की यांनी आंद्रेई यांचे समर्थन करत म्हटले की, हे सर्व ते समाजासाठी करत आहेत. चांगली गोष्ट करणाऱ्यांवर सर्वच टीका करत असतात. शाळेच्या अधिकाऱ्यांनी देखील आंद्रेई यांचे समर्थन केले आहे. आंद्रेई म्हणाले की, जर शाळा महालांप्रमाणे असेल तर मुलांना आनंद होईल, त्यांना अधिक चांगले वाटेल. याआधी रशियातील द कॅसल ऑफ चाइल्डहुड किंडरगार्डन शाळेत देखील अशाच प्रकारे बदल करण्यात आलेले आहेत.

## व्हिएतनाममध्ये अजब फायर ब्युटी थेरपी

## आग लावून उपचार!

लंडन : आपण सर्वांत सुंदर दिसावे, आपल्याकडे इतरांचे लक्ष आकृष्ट व्हावे, असे कोणाला वाटत नाही? काही लोक यासाठी नित्य नव्या ब्युटी ट्रीटमेंटस्, नित्य नवी सौंदर्यप्रसाधने आजमावत असतात. केवळ सुंदर दिसण्याच्या आग्रहाखातर धोकादायक ठरू शकणाऱ्या ब्युटी थेरपीज वापरताना देखील लोक मागेपुढे पाहत नाहीत. सध्या व्हिएतनाममध्ये देखील सुंदर दिसण्यासाठी एक नवी, पण विचित्र ब्युटी ट्रीटमेंट लोकप्रिय होत आहे. आपली त्वचा सुंदर, नितळ आणि चमकदार व्हावी याकरिता व्हिएतनामी लोक सध्या फायर ब्युटी थेरपी आजमावत आहेत. व्हिएतनाम मधील अनेक प्रसिद्ध ब्युटी पार्लर्समध्ये ही थेरपी करण्यात येत असून, यासाठी लोक गर्दी करत आहेत, हे विशेष. चेहऱ्यावर एक टॉवेल ठेऊन यावर आगीचे निखारे ठेवले जातात. हा जळता टॉवेल काही सेकंदांच्या अवधीसाठी चेहऱ्यावर ठेवला जातो. ही थेरपी करणाऱ्या तज्ज्ञांच्या मते या थेरपीमुळे त्वचेचे सौंदर्य वाढतेच. त्याशिवाय डोकेदुखी, अनिद्रा, अंगदुखी



यांसारख्या समस्यांवरही ही थेरपी गुणकारी असल्याचे समजते. या थेरपीमुळे पचनतंत्र सुरळीत राहते. सध्या सोशल मीडियावर या ब्युटी थेरपीचे व्हिडियो व्हायरल होत असून, यावर येणाऱ्या प्रतिक्रियांवरून लोकांमध्ये ही थेरपी अतिशय लोकप्रिय होताना पहावयास मिळत आहे. ही थेरपी करण्यासाठी एका खास पद्धतीचा अवलंब केला जातो. यात एका टॉवेलवर अल्कोहोल शिंपडून या टॉवेलने चेहरा संपूर्णपणे झाकला जातो. तसेच या टॉवेलवरील निखाऱ्यामुळे चेहऱ्याला कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ नये यासाठी देखील आवश्यक ती काळजी घेतली जात असून, या थेरपीमुळे कोणाच्या चेहऱ्याला इजा झाल्याचे आजवर ऐकिवात आलेले नाही. या थेरपीमुळे चेहऱ्यावरील कोशिका सक्रीय होत असून, त्यामुळे त्वचेचे सौंदर्य वाढते. या थेरपीमुळे त्वचेवरील सुरकुत्या नाहीशा होत असून, ही थेरपी चेहऱ्यासोबतच शरीरावर इतरत्रही केली जाऊ शकते. ही थेरपी प्रशिक्षित तज्ज्ञांच्या द्वारे केली जात असल्याने यामधून कोणत्याही प्रकारचे नुकसान संभवत नसल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

## महिलांची सुरक्षा करणारा नेकलेस

नवी दिल्ली : केवळ भारतातच नाही, तर जगातील बहुतेक सर्वच देशांमध्ये महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिकाधिक गंभीर होत चालला आहे. महिला सार्वजनिक ठिकाणी असेल, प्रवास करत असेल किंवा अगदी स्वतःच्या घरातदेखील सुरक्षित नाहीत. या समस्येवर तोडगा म्हणून आजकाल मोबाइल फोनवर अनेक ॲप्स विकसित करण्यात आली आहेत.याच संकल्पनेवर आधारित लीफ वेअरेबल्स या भारतीय कंपनीने पेंडंट नेकलेस तयार केला आहे. या नेकलेसमध्ये असणाऱ्या पेंडंटमध्ये आवाज रेकॉर्ड करता येण्याबरोबरच व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्याची सोय आहे. तसेच कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी आपली मित्रमंडळी किंवा नातेवाइकांना संपर्क साधणे देखील या नेकलेसच्या माध्यमातून शक्य होणार आहे. या नेकलेसच्या माध्यमातून इतरांना मदतीचा संदेश पाठविण्यासोबतच महिलेचे लोकेशन देखील समजण्यास मदत होणार आहे. या नेकलेसच्या, प्रायोगिक पातळीवर निरनिराळ्या ठिकाणी यशस्वी चाचण्या करण्यात आल्या आहेत. यात निरनिराळ्या इमारती, सार्वजनिक वाहने आणि फारशी वस्ती नसलेल्या ठिकाणी देखील या नेकलेसची यशस्वी चाचणी करण्यात आली आहे. हा नेकलेस तयार करणाऱ्या लीफ वेअरेबल्स या कंपनीला वुमेन्स सेफ्टी एक्स प्राईझ या सन्मानाने गौरविण्यात आले असून, हा सेफ्टी नेकलेस अधिक विकसित करण्यासाठी एक मिलियन डॉलर्सची रक्कम पुरस्काराअंतर्गत देण्यात आली आहे. एका सर्वेक्षणाच्या अनुसार भारत हा महिलांसाठी असुरक्षित असलेला देश म्हटला गेला आहे. सर्वसाधारणपणे पाचपैकी किमान एक महिला कधी ना कधी संकटाच्या प्रसंगांना तोंड देत असल्याचे या सर्वेक्षणामध्ये म्हटले आहे.

## शॉर्ट न्यूज

### यशवंत सेनेचा महायुतीला पाठिंबा

■ **कर्जत :** राज्यातील महायुती सरकारने धनगर आरक्षणातील प्रमुख अडचण दूर केली आहे. धनगड हा राज्यात राहत नाही व खिल्लारे कुटुंबाचे धनगड प्रमाणपत्र रद्द केले आहे. यामुळे आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. तसेच आरक्षणाबाबतडॉ. सुधाकर शिंदे समितीचा अहवाल सरकारला दिला आहे. त्यामुळे महायुती सरकार आम्हाला आरक्षण देईल, हा विश्वास असल्यामुळे राज्यातील धनगर उमेदवारांसह महायुतीला बिनशर्त पाठिंबा देण्याचा निर्णय यशवंत सेनेच्या पदाधिकारी व कोअर कमिटीने घेतला असल्याचे यशवंत सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब दोडतले यांनी जाहीर केले.

### विशाल सुर्वे खूनप्रकरणी एकास जन्मठेप

■ **जामखेड :** अडीच वर्षांपूर्वी खर्डा येथील विशाल सुर्वे खून प्रकरणी तीन आरोपीपैकी एकास श्रीगोंदा येथील जिल्हा व अति सत्र न्यायाधीश मुजीब शेख यांनी जन्मठेपेची शिक्षा व १३ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. मयताच्या पत्नीसह दोघांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. याबाबत अधिक माहिती तात्कालिन पोलिस निरीक्षक गायकवाड संभाजी यांनी तपासाची चक्रे फीरवत गुन्ह्यातील आरोपींच्या मुसक्या आवळण्यासाठी विविध शोध पथके तयार करण्यात आली होती.

### आ.काळे यांच्याकडून विकासाची वचनपूर्ती

■ **कोपरगाव :** येथील पाणी प्रश्न एवढा भीषण होता की, हॉस्पिटलमध्ये डिलिव्हरीसाठी आलेल्या महिलेच्या कुटुंबाला पाणी विकत घ्यावे लागत होते. आ. आशुतोष काळे यांनी हा प्रश्न सोडविल्यामुळे आता ही परिस्थिती बदलली आहे. शहराच्या विकासातून यावर्षीची व्यावसायिकांची दिवाळी देखील जोरात झाली आहे. आ. काळे यांनी विकासाची दिलेली वचने पूर्ण केली असून विकासाचा विश्वास मतदानातून व्यक्त करा आणि आ. आशुतोष काळे यांनामोठ्या मताधिक्याने निवडून द्या, असे आवाहन चैताली काळे यांनी केले.

### शिर्डीत स्वातंत्र्य समता बंधुता आणणार

■ **शिर्डी :** महाविकास आघाडीचे सरकार शिर्डी मतदारसंघात समता, बंधुता व स्वातंत्र्य आणेल. येथील दहशत आम्ही थांबवू, असे प्रतिपादन काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केले. शिर्डी मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रभावती घोगरे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी खासदार नीलेश लंके, भाऊसाहेब वाकचौरे, घनश्याम शेलार, बाळासाहेब गायकवाड, ॲड. नारायण कार्ले, सचिन कोते, डॉ. एकनाथ गोंदकर, ज्ञानेश्वर वर्षे, राजेंद्र निर्मळ, श्रीकांत मापारी, आदींची उपस्थिती होती.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ठार

■ **नेवासा :** तालुक्यातील घोडेगाव येथे अहिल्यानगर ते संभाजीनगर रोडवरील चर्च समोर कुणीतरी अज्ञात वाहन चालकाने छत्तीसगढ राज्यातील संतोष केतन यादव (वय ३८, रा. बेरला, जि. बेमतरा) याला धडक दिली. यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी फिर्यादी मयताची पत्नी रत्ना संतोष यादव यांनी सोनई पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, घोडेगाव येथील चर्च समोरून जात असताना संतोष यादव यांना अज्ञात चालकाने आपल्या ताब्यातील वाहनाने जोरदार धडक दिली. त्यामध्ये संतोष यादव यांचा जागीच मृत्यू झाला आहे, असे फिर्यादीत म्हटले आहे.

# मतदान केंद्रांवर पुरेशा सुविधा पुरवाव्यात

## उपनिवडणूक आयुक्त हिरदेश कुमार यांचे निर्देश




**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रत्येक मतदान केंद्रांवर मतदारांना किमान आश्वासित सुविधा योग्यरित्या पुरविल्या जातील. यासाठी योग्य व्यवस्थापन करावे, असे निर्देश भारत निवडणूक आयोगाचे उप निवडणूक आयुक्त हिरदेश कुमार यांनी आज कोकण व नाशिक विभागातील निवडणूक यंत्रणांना दिले.**

सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित कोकण व नाशिक विभागांतर्गत सर्व जिल्ह्यांतील विधानसभा मतदारसंघांमधील निवडणूक पूर्वतयारीबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला भारत निवडणूक आयोगाचे उप निवडणूक आयुक्त संजय कुमार, प्रधान सचिव अविनाश कुमार, राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम, भारत निवडणूक आयोगाचे उपसचिव सुमनकुमार, नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम आदी उपस्थित होते.

हिरदेश कुमार म्हणाले की, शहरी भागात मतदानाच्या टक्केवारीत वाढ होण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करावेत. मतदारांना आपल्या मतदान केंद्राची माहिती व्हावी यासाठी सर्व साधनांचा अवलंब करावा. मतदार चिठ्ठ्यांचे १०० टक्के आणि वेळेत वाटप करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

# दिव्यांग बांधवांनी घेतली मतदानाचा हक्क बजावण्याची शपथ !

## मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी जनजागृती | मनपाच्या उपाययोजना

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात महानगरपालिकेच्या वतीने मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. याअंतर्गत शहरातील १ हजार ३९७ दिव्यांग बांधवांनी महानगरपालिकेत १०० टक्के मतदानाचा संकल्प करत शपथ घेतली. त्यांच्याकडून स्वयंघोषणापत्र देखील घेण्यात आले. सर्व दिव्यांग बांधव मतदानाचा अधिकार पूर्णपणे बजावणार असल्याचे संकल्पपत्र भरुन दिले.**




आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, शहरातील विविध घटकातील नागरिक दिव्यांग बांधव, तृतीयपंथी, आदींमध्ये जनजागृती करून १०० टक्के मतदानाचा संकल्प करणारी शपथ सर्वांना दिली जात आहे. महानगरपालिकेच्या बससेवा देणाऱ्या बसेस, बस स्टॉप, कचरा संकलन करणाऱ्या घंटागाड्या आदींवर फलक लावून, जिंगल्स वाजवून मतदारांमध्ये जनजागृती केली जात आहे.

मतदार जागृतीसाठी आयुक्त यशवंत डांगे यांनी थेट नागरिकांशी संवाद साधला. यावेळी पत्रकार चौक ते दिल्लीगेट या रस्त्याच्या कामाची पाहणी करत कामाचा आढावा त्यांनी घेतला. कामामुळे वाहतुकीस अडथळा होत असला तरी भविष्यात चांगले रस्ते उपलब्ध होणार असल्याने व कायमचा प्रश्न मार्गी लागणार असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.रस्त्याचे काम सुरु असताना नागरिकांना वाहतुकीस अडथळा होणार नाही, यादृष्टीने शक्य त्या उपाययोजना कराव्यात, अशा सूचनाही आयुक्तांनी ठेकेदार संस्थेला केल्या आहेत. मतदार जनजागृतीसाठी मतदारांकडून संकल्पपत्र भरुन घेतले जात आहेत. मॉर्निंग ग्रुपमध्ये चर्चासत्र महापालिकेतील देयके, विविध पावत्यांवर वॉटरमार्कद्वारे मतदार जागृतीचा लोगो छापण्यात आला आहे. सोशल मीडियात अधिकाऱ्यांमार्फत मतदारांना मतदानासाठी आवाहन केले जात आहे. शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम, कार्यक्रमांच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. विविध मॉर्निंग ग्रुपमध्ये चर्चासत्र घडवून आणत वेगळ्या प्रकारे जनजागृती केली जात आहे.

**वाचकांच्या लेखणीतून**

# समाजवादी संसदपटू मधू लिमये यांचे वक्तृत्व

१९८७ साल असावे. भारताला स्वातंत्र्य मिळवून ४० वर्षे झाली होती. त्या निमित्ताने थोर समाजवादी नेते आणि माजी खासदार मधु लिमये (ज.१९२२) यांचे भारतीय स्वातंत्र्याची ४० वर्षे या विषयावर मुंबई विद्यापीठात व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्या काळी आपल्या घणाघाती वक्तृत्वाने गाजलेल्या खासदाराचे भाषण ऐकण्यासाठी मीही गेलो होतो. उत्सुकता होती. आवडही होती. गेलो. दर्दी श्रोत्यांची गर्दी होती. हल्लडगुल्लड मात्र मुळीच नव्हती. लिमयांनी इंग्रजीतून व्याख्यान द्यायला आरंभ केला. श्रोत्यांनी हिंदी भाषेत व्याख्यान व्हावे, असा आग्रह केल्यावर हिंदीत व्याख्यान झाले. अगदी शेवटपर्यंत. त्या व्याख्यानाला पुढे स्वातंत्र्य चळवळीची विचारधारा असे ग्रंथरूपही लाभले. लिमयांचे हिंदीवर प्रभुत्व होतेच. डॉक्टर राममनोहर लोहियांचा प्रभाव!



डॉ राममनोहर लोहियांचे साहित्य वाचूनच मी मधू लिमये, एसेम जोशी अशा समाजवादी विचारकांच्या काल आणि कर्तृत्वाचा अभ्यास करू लागलो. मला आठवते. मधू लिमयांची आत्मकथा वाचल्याने मुंबईच्या लोकसत्ता दैनिकात माझे एक पत्रही प्रकाशित झाले होते.

वाघासारखा आवाज होता लिमयांचा! व्याख्यान छानच झाले. ते संसदपटू म्हणून प्रसिध्दी पावले होते. सध्याचे संयुक्त जनता दलाचे शरद यादव त्यांना चालती बोलती संसद म्हणत. तत्कालीन सरकारने त्यांचा धसका घेतला होता. लिमयांचे वैशिष्ट्य म्हणजे ते एक मराठी व्यक्ती असूनही बिहारमधून लोकसभेवर निवडून जात, ही मोठीच नवलाची गोष्ट होती. एका संसदपटूचे वक्तृत्व ऐकण्यासाठीच गेलो होतो. तृप्त झालो. १९९५ साली त्यांचे देहावसान झाले. एक तळमळीचा स्वातंत्र्यसैनिक, वक्ता, अभ्यासक, चिंतक, लेखक आणि धडाडीचा समाजवादी पक्षाचा नेता काळाच्या पडद्याआड गेला. फार दु:ख झाले.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,जि. अहमदनगर.**

# काळाच्या ओघात लेण्या नामशेष होण्याच्या मार्गावर

## ऐतिहासिक लेण्यांकडे पुरातत्त्व विभागाचे दुर्लक्ष

**जुन्नर : प्रतिनिधी**

**जगाच्या पाठीवर कमीत कमी भूभागावर सर्वाधिक लेण्या असणारे एकमेव ठिकाण म्हणजे जुन्नर तालुका! मात्र, येथील सर्वच लेण्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. पुरातत्त्व विभागाच्या उदासीनतेमुळे काळाच्या ओघात या लेण्या नामशेष होण्याच्या मार्गावर असून, सध्या भग्नावस्थेत उभ्या आहेत.**

जुन्नर तालुक्यातील पिंपळगाव जोगा धरणाच्या जवळ असणाऱ्या खिरेश्वर येथील नागेश्वर मंदिराच्या काही अंतरावर एक भूसपाटीला असणाऱ्या खडकात एक प्राचीन लेणी कोरलेली आहे. या लेण्यांमध्ये सुमारे ३० फूट बाय ५० लांबीचा सभामंडप असून, हा सभामंडप १० दगडी खांबांवर उभा आहे. सभामंडपाच्या शेजारीच एक १० बाय १० ची खोली आहे. दरवर्षी पावसाळ्यात या लेण्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साठले जाते. सभामंडपाला असणाऱ्या दगडी खांबांची अनेक ठिकाणी तुटफूट झाली आहे. काही खांबांना मोठे तडे गेले आहेत. ही लेणी भुईसपाटीला असल्याने नागेश्वराचे दर्शन घेऊन निघाल्यानंतर ही लेणी लक्षात येत नाहीत.

अगदीच जवळ जाऊन पाहिल्यानंतर या ठिकाणी लेणी असल्याचे जाणवते. लेणी म्हणजे दगडात कोरलेले विवर होय. भारतातील सर्व लेण्या या लोहयुगात तयार करण्यात आल्या आहेत. भारतात आतापर्यंत १२०० लेण्या सापडल्या असून, त्यापैकी ८०० बुद्ध लेण्या आहेत, तर एकट्या जुन्नर तालुक्यात ३५० लेण्या आहेत. या लेण्यांमध्ये काही जैन, तर काही बुद्ध लेण्या आहेत. जुन्नर तालुक्यात सर्वात पहिली खोदलेली लेणी ही तुळजा लेणी आहे. या सर्व लेण्या राजे, महाराजे यांनी दिलेल्या दान



व देणग्यांमधून तयार झाल्याचे शिलालेखांमधून आढळते. लेणी कोरण्याची कला महाराष्ट्रात १००० ते १२०० वर्षे जोपासली गेली.

जुन्नर तालुक्यातील लेण्या या सातवाहनकालीन असून, चंद्रगुप्त मौर्य कालाखेर ते इ. स. पूर्वीच्या दुसऱ्या शतकाच्या प्रारंभीच्या काळातील आहेत. बौद्ध धर्माच्या प्रसाराचा व प्रचाराचा केंद्रबिंदू म्हणून जुन्नर तालुक्याची एक आगळीवेगळी ओळख आहे. बौद्ध धर्माचा प्रचार करण्याचे कार्य सर्वप्रथम जुन्नर तालुक्यात सुरू असल्याचे काही ठिकाणी उल्लेख आहे. लेण्यांमधील शिलालेख हे ब्राम्ही लिपीत असून, त्याची प्राकृत भाषा असल्याचे इतिहास अभ्यासक बापू ताम्हाणे यांनी सांगितले.

# पीडब्लूडीने थांबवले पिंपळगाव माळवी पुलाचे काम

## नवीन आमदाराच्या हस्ते उद्घाटनासाठी अट्टहास

**पिंपळगाव माळवी : प्रतिनिधी**

**वांबोरी-शेंडी जिल्हामार्गातील पिंपळगाव माळवी तलावावर वेगाने चार कोटींच्या पुलाचे काम करण्यात आले, असून वाहतूक खुली करण्यात आली. परंतु, पुलावर केवळ मुरूम टाकून बोळवण करण्यात आल्याने, हा पुल अपघाताला निमंत्रण देणारा ठरत आहे. नवीन आमदाराच्या हस्ते, उद्घाटनासाठी या पुलाचे पुढील काम सार्वजनिक बांधकाम विभागाने थांबवल्याची चर्चा आहे.**

सद्यस्थितीत पुलावर मुरूमाचे खडे असल्याने मोटारसायकलस्वार घसरून पडत आहेत. वांबोरी ते शेंडी हा प्रमुख जिल्हा मार्ग आहे. या मार्गावरून शेंडी, पिंपळगाव माळवी, डोंगरगण, मांजरूसुंबा, वांबोरी पुढे ब्राम्हणी तसेच राहुरीकडे जाणाऱ्या वाहतुकीची मोठी वर्दळ असते. ग्रामीण भागातील महत्वपूर्ण गावांना जिल्ह्याच्या ठिकाणी जोडणारा हा महत्वपूर्ण मार्ग आहे. पिंपळगाव माळवी येथील तलावाचा सांडवा याच रस्त्यावर आहे. १९२० मध्ये बांधलेल्या सांडव्याला शंभर वर्षे पूर्ण झाली होती. परंतु, दरवर्षी तलावाला पाणी आल्यानंतर सांडव्यावरील पाण्यामुळे वाहतूक विस्कळीत होत होती. या ठिकाणी पुल उभारणीची अनेक वर्षांची मागणी होती. परंतु, यंदा निवडणुकांपूर्वी पुलाच्या कामाला गती मिळाल्याचे पहायला मिळाली.



बांधकाम विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार नाबार्ड अंतर्गत या पुलासाठी चार कोटी मंजूर झाले होते. त्यानुसार मागील दोन महिन्यात काम वेगाने पूर्ण करण्यात आले. या कामासाठी हा रस्ता बारा दिवस बंद ठेवण्यात आला होता. पुलाचे काम पूर्ण झाले आहे. परंतु, संबंधित ठेकेदाराने पुलावर डांबरीकरण केले नाही.

बांधकाम विभागाने पूल वाहतुकीसाठी खुला करून दिला. सद्यस्थितीत मोठ्या खडीमुळे वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे. टायरचे नुकसान तसेच दुचाकीस्वार घसरून पडत असल्याने नागरिकांमध्ये संताप आहे. खडी व खड्डे चुकवत वाहनाचालकांना करावी लागते कसरत वांबोरी-शेंडी मार्गावरील डोंगरगणपासून शेंडीच्या दिशेने एक ते दीड किलोमिटर भागात खड्डे बुजवण्याचा अजब प्रकार पहायला मिळाला. दोन्ही बाजुला खचलेल्या रस्त्यावर मोठी खडी टाकली होती. त्यावर पॅचिंग झालेले नाही. त्यामुळे खडी व खड्डे चुकवत वाहनाचलकांना कसरत करावी लागत आहे. बांधकाम विभागाने येथेही दुर्लक्ष केले आहे.

# मोदींचा संविधानात बदल करण्याचा डाव होता

## शरद पवारांचा पंतप्रधानांवर घणाघात

**उदगीर : प्रतिनिधी**



**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी शरद पवार यांनी शनिवारी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉक्टर बाबासाहेब आबंडेकर यांच्या संविधानात बदल करण्याचा कट रचला होता. पण लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राने त्यांना त्यांची जागा दाखवून दिली, असे ते म्हणाले.**

शरद पवार यांची शनिवारी उदगीर येथे सभा झाली. या सभेत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर संविधानात बदल करण्याचा कट रचल्याचा आरोप केला. ते म्हणाले, ५-६ महिन्यांपूर्वी आपण लोकसभेच्या निवडणुकीला सामोरे गेलो.

त्यावेळी देशाचे राज्य गेल्या १० वर्षांपासून मोदींच्या हातात होते. देशातील शेतकरी वर्ग संकटात सापडला होता. त्याची अस्वस्थता घालवायची असेल तर मोदींना हलवून जागे करण्याची गरज होती. त्यासाठी आम्ही काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वात विरोधी पक्षांची इंडिया नावाची आघाडी स्थापन केली. त्यानंतर आम्ही लोकसभा निवडणुकीला सामोरे गेलो. नरेंद्र मोदी यांना लोकसभा निवडणुकीत ४०० हून जास्त जागा हव्या होत्या. त्यांनी यासाठी ४०० पारचा नारा दिला होता. त्या घोषणेत काहीतरी पाप असल्याचा संशय आम्हाला आला होता.

आमचा संशय अगदी खरा होता. या सरकारने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या संविधानात काही बदल करण्याचा डाव रचला होता. त्यातून जनतेच्या अधिकारांवर गदा येणार होती. हे कट कारस्थान पूर्ण करण्यासाठी मोदी व त्यांच्या सरकारला ४०० च्या आसपास जागांची गरज होती. मी महाराष्ट्रातील जनतेला धन्यवाद देऊ इच्छितो. येथील जनतेने मोदी व शहांना त्यांची जागा दाखवण्याचे काम केले. यामुळे संविधानात बदल करण्याचा कट उधळला गेला, असे शरद पवार म्हणाले.

# लंके यांच्या प्रचारफेरीत रंगला लेझिमचा डाव!

## नांदूरपठार येथे राणी लंके यांचे जल्लोषात स्वागत



महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या प्रचारार्थ नांदूरपठार येथे बैठक पार पडली.

**नांदूरपठार : प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणूकीतील महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या प्रचारार्थ काढण्यात आलेल्या प्रचार फेरीत लेझिमचा डाव रंगला. लयबध्द लेझिम खेळणाऱ्या नागरीकांनी रॅलीत सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांची लक्ष वेधून घेतले. नांदूरकरांनी केलेल्या या अनोख्या स्वागताना राणी लंके या भारावून गेल्या.**

शनिवारी उमेदवार लंके यांचे नांदूरपठार येथे आगमन झाल्यानंतर लेझिमच्या डावाबरोबरच पारंपारिक सनई, ढोल व ताशांच्या गजरात त्यांचे स्वागत करण्यात आले. मिरवणूकीने बैठकीच्या ठिकाणी पोहचल्यानंतर राणी लंके यांनी उपस्थितांशी संवाद साधताना येत्या २० तारखेला आपणास मतदान करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी बोलताना लंके म्हणाल्या, जिल्हा परिषद पंचायत समितीमध्ये काम करताना आपण सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये केलेल्या कामाचे मुल्यमापन करून महाविकास आघाडीतील नेत्यांनी आपणास विधानसभा निवडणूकीच्या उमेदवारीची संधी दिली. या संधीचे सोने करून जिल्हा परिषद, पंचायत समितीमध्ये केलेल्या कामाप्रमाणेच विधिमंडळात आपण काम करून दाखवू अशी ग्वाही लंके यांनी दिली.

निवडणूकीच्या प्रचारानिमित्त मतदारसंघातील प्रत्येक गावामध्ये प्रचाराची एक फेरी पुर्ण झाली असून प्रत्येक गावामध्ये मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. खा. नीलेश लंके यांनी गेल्या पाच वर्षात केलेले काम मतदारांना भावले असून त्याची आठवण करीत विधानसभा निवडणूकीमध्ये आपणास साथ देण्याची ग्वाही त्यांच्याकडून देण्यात येत असल्याचे लंके यांनी सांगितले.

यावेळी रामदास वलवे, दत्तात्रय चौधरी, भागा बुवा चौधरी, नाना महाराज चौधरी, सोनिया राजदेव, नामदेव देशमाने, मारूती रेपाळे, अशोक घुले, मोहनराव रोकडे, सुवर्णा धाडगे, प्रियंका खिलारी, राजूशेठ चौधरी, रविंद्र राजदेव, अर्जुन देशमाने, दत्ता देशमाने आदी उपस्थित होते.

### एकशिक्की मतदान देणार

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर प्रथमच नांदूरपठार गावामध्ये कोटयावधी रूपयांची विकास कामे माग लागली असून नांदूरपठारची वाटचाल आदर्श गावाकडे सुरू आहे. खा. नीलेश लंके यांनी गावासाठी मोठया निधी दिल्याने लोकसभा निवडणूकीत नांदूरकरांनी त्यांना भरभरून मते दिली. आता विधासभा निवडणूकीत आम्ही एकशिक्की मतदान देणार आहोत.

रविंद्र राजदेव
मा. सरपंच

### महिलांचे पाठबळ

महिला सक्षमीकरणाचा पुरस्कार करणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी माझ्यासारख्या महिलेस उमेदवारी देत महिला वर्गाला न्याय दिला आहे. विधिमंडळात आपले प्रतिनिधीत्व एक महिला करणार असल्याने मतदारसंघातील प्रत्येक गावांतील महिलांचे मला पाठबळ मिळत आहे. प्रत्येक बैठकीत महिलांची संख्या लक्षणीय असते.

राणी लंके
महाविकास आघाडीच्या उमेदवार

# विकास कामांतून संग्राम जगताप यांनी माणसं कमवली

## मा. आ. अरूणकाका जगताप यांचे प्रतिपादन

**भुतकरवाडी : प्रतिनिधी**

**गेल्या दहा वर्षामध्ये शहराचे लोकप्रतिनिधी म्हणून आमदार संग्राम जगताप यांनी मोठया प्रमाणावर विकास कामे राबविली. याच विकास कामांच्या जोरावर आ. जगताप यांनी माणसं कमविली असल्याचे प्रतिपादन मा. आ. अरूणकाका जगताप यांनी केले.**

नगर शहर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार संग्राम जगताप यांनी भुतकरवाडी परिसरातील नागरिकांशी संवाद साधला.यावेळी मा. आ. अरूणकाका जगताप यांनीही आपल्या भावना मांडल्या. यावेळी भाजपाचे शहराध्यक्ष अभय आगरकर, मा. महापौर बाळासाहेब वाकळे, मा नगरसेवक महेंद्र गंधे, दगडू पवार, रवींद्र बारस्कर, वंदना ताठे, पल्लवी जाधव आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मा. आ. जगताप म्हणाले, विधानसभा निवडणूकीची रणधुमाळी सुरू झाल्यानंतर आ. संग्राम जगताप यांनी प्रत्येक प्रभागातील नागरीकांशी संवाद साधला असून त्यांच्या प्रचार रॅलींना नागरीकांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभतो आहे. गेल्या दहा वर्षात राबविलेल्या विकासाच्या योजना आम्ही नागरीकांपुढे जात असून ही निवडणूक विकासाच्या मुद्यावर आम्ही लढवत आहोत. विकास कामांमधून आ. संग्राम जगताप यांनी माणसं कमविली आहेत. नागरिकांच्या सुख, दुःखात सहभागी होउन ऋणानुबंध जोपासण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. नगरकर नेहमीच चांगले काम करणारांच्या पाठीशी उभे राहतात. आ. संग्राम जगताप यांनी दहा वर्षाच्या कालखंडात मोठे काम उभे केले असून नगरकर त्यांच्या पाठीशी एकसंघपणे उभे राहून त्यांना तिसऱ्यांना सेवा करण्याची संधी देणार असल्याचा विश्वास मा. आ. जगताप यांनी व्यक्त केला.



भुतकरवाडी परिसरातील नागरिकांशी मा. आ. अरूणकाका जगताप, आ. संग्राम जगताप यांनी संवाद साधला.

### आ. जगताप यांचा विजय निश्चित !

महायुती सरकारच्या माध्यमातून नगर शहरामध्ये विकासाचे भरीव काम उभे राहत आहे. या कामसाठी आ. संग्राम जगताप यांनी पाठपुरावा करत मोठा निधी उपलब्ध करून दिला असल्याने शहराच्या सर्वच भागात विकास कामे सुरू आहेत. विकास कामांमुळे नागरीक समाधान व्यक्त करीत आहेत. विकास कामांमुळे महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांचा विजय निश्चित झाला आहे.

महेंद्र गंधे, मा. नगरसेवक

# भोयरे गांगर्डा कडूसमध्ये विजेचा खेळखंडोबा

## शेतीपंपाला अनियमित विद्युत पुरवठा | शेतकरी वर्ग मेटाकुटीला

**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील भोयरे गांगर्डा व कडूस येथील शेतीपंपासह घरगुती विजेचा खेळखंडोबा होत असल्याने शेतकरी पुर्णतः मेटाकुटीला आला आहे. ऐन दिपावलीच्या काळात महावितरणकडून यात सुधारणा न झाल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.**

सुपा सबस्टेशन अंतर्गत भोयरे गांगर्डा व कडूस येथील शेतीपंपासह घरगुती विजेचा पुरवठा केला जातो. दिवसपाळी आठ तास व रात्रपाळी आठ तास असा हा वीज होतो. मात्र गेल्या पंधरा दिवसांपासून सतत वीजपुरवठा खंडित होत असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.

विद्यूत पुरवठा सुरळीत करावा याबाबत गेली दहा दिवसांपुर्वी भोयरे गांगर्डा ग्रामपंचायतीच्या वतीने महावितरण अभियंत्यास निवेदन देण्यात आले होते मात्र त्यात सुधारणा झाली नसल्यामुळे ग्रामस्थ आक्रमक भूमिका घेण्याच्या तयारीत आहेत.

चालू वर्षी पाऊस जास्त प्रमाणात झाल्यामुळे परिसरात ७० टक्के शेती आजही पाण्याखाली आहे.३० टक्के शेतकऱ्यांनी शेतात रब्बी हंगामातील ज्वारी, गहू हरभरा, कांदा, मका, कडवळ, घास आदींची पेरणी व लागवड केली आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने शेतातील पिके सुकू लागली आहेत. त्या पिकांना पाणी देणे अत्यंत गरजेचे असताना दिवसा तर सोडा रात्र रात्र जागून देखील पिकाला पाणी देता येत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

राज्यात सध्या विधानसभा निवडणुकीचा प्रचार जोरात सुरू आहे. विविध पक्षाकडून शेतकऱ्यांसाठी आश्वासनांची खैरात वाटली जात आहे. मात्र प्रत्यक्षात २४ तासातले १२ तास सोडा फक्त ८ तासच वीजपुरवठा द्या पण तो पूर्ण क्षमतेने द्या अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. अन्यथा कुठलीही पुर्वसुचना न देता महावितरण कार्यालयाला टाळे ठोकण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# तनपुरेंच्या प्रचार फेरीस उदंड प्रतिसाद

## नागरीकांकडून ठिकठिकाणी फेरीचे स्वागत




**राहुरी : प्रतिनिधी**

**राहुरी-नगर-पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार प्राजक्त तनपुरे यांच्या प्रचारार्थ राहुरीमध्ये काढण्यात आलेल्या प्रचार फेरीस नागरिकांकडून उदंड प्रतिसाद लाभला. प्रचार फेरीदरम्यान ठिकठिकाणी नागरीकांकडून स्वागत करण्यात आले.**

आमदार प्राजक्त तनपुरे यांनी विधिमंडळात मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना विविध विकास कामे माग लावली. वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले प्रश्न त्यांनी माग लावत दहा पंधरा वर्षांपासूनचा विकासाचा बॅकलॉग त्यांनी भरून काढला. उर्जा खात्याचे राज्यमंत्री म्हणून काम करताना तनपुरे यांनी मतदारसंघातील वीजेचा प्रश्न मार्गी लावला. राहुरी शहरातही तनपुरे यांनी नागरी समस्या दुर करण्यावर भर दिला. तनपुरे यांनी केलेल्या विविध विकास कामांमुळे येत्या २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभेच्या निवडणूकीत आम्ही त्यांच्या पाठीशी उभे राहणार असल्याची निःसंदिग्ध ग्वाही मतदारांकडून या प्रचार फेरीदरम्यान देण्यात येत होती.

येवले आखाडा, मारूती मंदिर, जोगेश्वरी आखाडा,काळे आखाडा येथून सुरूवात करण्यात आलेल्या प्रचार रॅलीमध्ये युवा नेते हर्षदादा तनपुरे, चाचा तनपुरे, प्रकाश भुजाडी, विजयकुमार डोले, वाय एस तनपुरे, नरेंद्र शिंदे, बाळू तनपुरे, शहाजी ठाकूर, दशरथ पोपळघट, मारूतराव हारदे, ज्ञानदेव हारदे, नंदकुमार तनपुरे, नरेंद्र शिंदे, विष्णू औटी, डॉ. जयंत कुलकर्णी, किशो जाधव,बाळासाहेब जाधव, संजय येवले, राऊ तनपुरे, मधुकर केशव भुजाडी, सोन्याबापू जगधने, भास्कर आल्हाट, नीलेश जगधने, संजय साळवे, दीपक साळवे, बाबासाहेब येवले, विठ्ठलनाना शेटे, प्रतिक शेटे, सुनील कवडे, मच्छिंद्र शेटे,रंगनाथ जाधव,रेवन्नाथ गाडे,सुधाकर येवले, मेजर येवले, गणेश ढेरे, प्रशांत डोले, शिवाजी नेहे, अक्षय जाधव, चांगदेव ढोकणे, शिवम शेवंते,भुषण शेटे,हरिभाउ औटी,बाळू गाडे, संतोष पांडे, राजू भवर, संदीप कदम, अर्जुन मोढे, जयराम गाडे, बंटी येवले, शिवाजी शेटे, संजीव पोटे,बापू गाडे, श्रीकांत जाधव, राहुल जाधव, भैय्या शेटे, चांगदेव शेवंते, अशाके गाडे, आजी, माजी नगरसेवक, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते प्रचार फेरीत सहभागी झाले होते.

### सुसंस्कृत, संयमी नेतृत्व

आ. प्राजक्त तनपुरे यांनी पाच वर्षे लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना एक सुसंस्कत व संयमी नेतत्वाचा वस्तुपाठ घालून दिला. पहिल्याच वेळी मंत्रीपदाची संधी मिळाल्यानंतर कृषी पंपांच्या वीजेची समस्या दुर करण्यासाठी पुढाकार घेत शेतकरी बांधवांना दिलासा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केल्याच्या भावनाही मतदारांनी व्यक्त केल्या.

# ठकसेन हरेल यांचे निधन

## पत्रकार जयसिंग हरेल यांना पितृशोक



**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज येथील ठकसेन बाबुराव हरेल यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी वृद्धापकाळाने शुक्रवार दि.८ रोजी निधन झाले. शेतकऱ्यांची कांदा चाळ तयार करण्यामध्ये कुशल मिस्तरी म्हणून त्यांचा नावलौकिक होता.**

कोणत्याही दुःखद प्रसंगांमध्ये धावून जात अंत्यविधीसाठी करण्यात येणाऱ्या तयारीसाठी ते सर्वप्रथम उपस्थित राहून मार्गदर्शन करण्यामध्ये कार्यरत राहून ते सेवाभावी काम करीत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन मुली, सुन, जावई नातू असा मोठा परिवार आहे. प्रसिद्ध फोटोग्राफर व पारनेर तालुका पत्रकार संघाचे सदस्य जयसिंग हरेल यांचे ते वडील होत तसेच सई ब्युटी पार्लरच्या संचालिका रुपा हरेल यांचे ते सासरे होत.

शुक्रवारी सायंकाळी सात वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पारनेर, शिरूर, आंबेगाव, जुन्नर तालुका फोटोग्राफर संघटनेचे पदाधिकारी व सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी पारनेर तालुका पत्रकार संघ व मराठी पत्रकार संघ तसेच ग्रामस्थ यांच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

# 'सबला'दिवाळी विशेषांक वाचकांच्या भेटीला!

## जी एस महानगर बँकेच्या संचालिका गीतांजली शेळके यांच्या हस्ते प्रकाशन



**पारनेर : प्रतिनिधी**

**ज्येष्ठ पत्रकार नाना करंजुले यांनी संपादित केलेल्या सबला या महिलांवर आधारित असलेल्या दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन जी एस महानगर बँक आणि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालिका गीतांजली उदय शेळके यांच्या हस्ते शुक्रवारी मुंबई येथे करण्यात आले. हा दिवाळी अंक वाचकांच्या पसंतीस उतरेल असा विश्वास शेळके यांनी यानिमित्ताने व्यक्त केला.**

इमेज क्रिएशनच्या माध्यमातून दरवर्षी एक विषय घेऊन पत्रकार नाना करंजुले दिवाळी अंक संपादित करतात. बांधिलकी, शून्यातील विश्व हे दिवाळी अंक अधिक लोकप्रिय झाले. यंदा चूल आणि मूल या पलीकडे जाऊन स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करणाऱ्या भगिनींची यशोगाथा मांडणारा सबला हा दिवाळी अंक इमेज क्रिएशनने संपादित केला आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, भारतीय सैन्य दलातील मेजर सीता शेळके, राहीबाई पोपेर, कर्तुत्वाची सावली शकुंतला ठाकूर, महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, राणी लंके, शिवकालीन युद्ध कलेत पारंगत असणाऱ्या जयश्री झा सुद्रिक, वारली चित्रकार शितल दिनकर, सुनिता पठारे, सुवर्णा हाडोळे, सीमा जगताप, वैदही मोरे, मनीषा गांगुर्डे, मानसी पोळ, डॉ रुक्मिणी धायगुडे, राजेश्री थोरात,निर्मला लंटाबळे यांच्यासह इतर महिला संदर्भात लेख प्रसिद्ध करण्यात आले आहे. ज्येष्ठ पत्रकार अभय मोकाशी यांनी सुद्धा महिला सबलीकरणाबाबत या विशेष अंकामध्ये लेखन केले आहे. दरम्यान मुंबई या ठिकाणी पार पडलेल्या प्रकाशन कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते सचिन गोडसे, माजी आरोग्य निरीक्षक दौलत शिंदे, गोपीनाथ पठारे, अमोल बोडके, पत्रकार अरुण कुमार मेहत्रे उपस्थित होते.

# पोतराज संघटनेचा आ. तनपुरे यांना पाठिंबा

## संघटनेच्या मागण्यांवर सकात्मक विचार करण्याची ग्वाही



**राहुरी : प्रतिनिधी**

**राहुरी-नगर-पाथर्डी मतदासंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार प्राजक्त तनपुरे यांना पोतराज सेनेच्या वतीने जाहिर पाठिंबा देण्यात आला. सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी राहुरी येथील आ. तनपुरे यांच्या संपर्क कार्यालयास भेट देत विधानसभा निवडणूकीत आ. तनपुरे यांच्या पाठिंब्याचे लेखी पत्र सादर केले.**

आगामी काळात संघटनेच्या माध्यमातून असणाऱ्या मागण्या तसेच कामांबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही आ. तनपुरे यांच्या वतीने देण्यात आली.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रामदास कणगरे, कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर जगधने, राज्य उपाध्यक्ष देविदास वैरागर, राज्य सरचिटणीस लखन ससाणे, ज्येष्ठ कार्यकर्ते भिकाजी दिवे थोपटे, तालुकाध्यक्ष सुरेश जगधने, युवक तालुकाध्यक्ष पप्पू वैरागर यांनी तनपुरे यांची भेट घेत विविध प्रश्नांवर चर्चा करत विधानसभा निवडणूकीत बिनशर्त पाठिंबा देण्याचा निर्णय जाहिर केला.

यावेळी बोलताना प्राजक्त तनपुरे म्हणाले, मतदारसंघातील या संघटनेचे पदाधिकारी तसेच स्थानिक कार्यकर्ते यांचा नेहमीच सबंध येतो. त्यांचे प्रश्न माग लावण्याचा आपण यापूर्वी प्रयत्न केलेला आहे. यापुढील काळातही या संघटनेच्या वतीने मांडण्यात येणारे प्रश्न सोडविण्यात येणार असून या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे आपणास नेहमीच सहकार्य लाभल्याचे तनपुरे यांनी नमुद केले. गेल्या पाच वर्षात विधिमंडळात आमदार म्हणून काम करताना आपण समाजातील वंचित घटकांना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला असून शासनाच्या विविध योजना त्यांच्यापर्यंत पोहचवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची भूमिका आपण पार पाडली असल्याचेही तनपुरे यांनी यावेळी संवाद साधताना सांगितले.

### आदर्श लोकप्रतिनिधी

आमदार प्राजक्त तनपुरे यांनी पाच वर्षे आमदार म्हणून काम करताना विविध विकास कामे माग लावत एका आदर्श लोकप्रतिनिधीचे दर्शन घडविले आहे. विकास कामांबरोबरच सर्वसामान्यांच्या सुख, दुःखात सहभागी होऊन जनतेला आधार देण्याचे कर्तव्य बजावले आहे. मतदारसंघातील विकास कामांची घोडदौड अशीच सुरू ठेवण्यासाठी आम्ही आ. तनपुरे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्णय घेतल्याचे पोतराज सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com